Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं.८३२ ए, अंतिम प्लॉट नं.१७८, १७९, बालचित्रवाणी मागे, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651730 : EPABX -25705000 :
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/३०१
पुणे-४११ ००४
दिनांक-२३/०१/२०२५

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु.-मार्च २०२५ चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal Exam.) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.....

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-२/१२० दि.०१/०१/२०२५
२. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-७/१२१ दि.०१/०१/२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal Exam.) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१) फेब्रु.-मार्च २०२५ मधील इयत्ता १२ वी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी "I.A.MARK" ही लिंक मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर दिनांक २४/०१/२०२५ ते दिनांक १८/०२/२०२५ या कालावधीमध्ये विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर गुण नोंदविताना त्याची पूर्णत: गोपनीयता राहील याची सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

२) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाबाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इ. गुणतक्त्यानुसार संबंधीत विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुण तक्त्यावर प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे. व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकीटावर उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व सांकेतिक क्रमांक लिहून गुणतक्ते व साहित्य सोमवार, दि.२४/०२/२०२५ रोजी विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहे. सदर गुणतक्त्यांची एक प्रत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

३) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे नाव, आईचे नाव व इतर दुरुस्त्या दि.१८/०२/२०२५ पर्यंत संदर्भिय पत्र क्र.२ मधील सूचना क्र.५ नुसार विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाच्या आहेत. यानंतर सदर दुरुस्त्यांसाठी ऑनलाईन लिंक उपलब्ध राहणार नाही.

४) अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये भरलेल्या व या Online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक उपलब्ध झाले नाहीत अथवा विद्यार्थ्यांनी ऐनवेळी **विषय बदल** केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने निर्धारित तारखेस विभागीय मंडळामध्ये जमा करावयाचे आहेत.

उपरोक्त प्रमाणे सदर सूचना व ONLINE गुणांसंदर्भातील सर्व बाबी आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-४

क्र.मुंविमं/उमाप/ ०२७९
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक-०३/०२/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्य. शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार / प्रकटनानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र. विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत योग्य त्या कार्यावाहीसाठी अग्रेषित :-
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग (पश्चिम/दक्षिण/उत्तर).
४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
प्रत माहितीस्तव :- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे

Scanned with OKEN Scanner